# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विदयामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व ) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेलः- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईटः- http://kbmc.gov.in

जा. क्र. कुबनप/ रुग्णालय/जाहिरात/५०१६ /२०२०-२१ दि.१७/०७/२०२०.

## जाहिर सुचना

**विषय :** कोरोना विषाणु (कोविड-१९)प्रार्दुभाव रोखण्यासाठी कुळगाव बदलापुर नगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर ३ महिने किंवा कोरोना विषाणु (कोविड-१९)चा प्रार्दुभाव संपेपर्यत जे आधी घडेल तोपर्यत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करणेबाबत.

कुळगाव बदलापुर नगरपरिषद क्षेत्रातील कोरोना (कोविड-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता कुळगाव बदलापुर नगरपरिषद क्षेत्रात काम करण्यासाठी पात्र इच्छुक उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधनावर कंत्राटी (करार) पध्दतीने सेवा घेणेबाबत उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २३/०७/२०२० (सार्वजनिक सुट्टी वगळुन) पासून घेण्यात येतील.

| अ. क्र | पदनाम | पात्रता | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | वैदयकशास्त्र तज्ञ | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी (मेडीसीन ) पदवी | ०६ | २,५०,०००/- |
| २ | मेडीकल मायक्रोबायोलॉजीस्ट (Medical /Microbilogist) | १.MD Microbiology<br>२.Experience: Working with Molecular Diagnostic laboratory specialization in Molecular Virology | ०२ | २,५०,०००/- |
| ३ | इंटेन्सीव्हीस्ट (intensivist) | १.MD/DNB Medicin/Anusthesia/critical care/chest with IDCCM/MBBS, DA/MBBS, DTCD with IDCCM with २-३ years experience in ICU | ०६ | २,५०,०००/- |
| ४ | कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी (Junior Medical Officer) | | | |
| ५ | एम.बी.बी.एस | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी<br>२.महाराष्ट्र मेडीकल कौन्सील /मेडीकल कौन्सील आफ इंडीया कडील नोंदणी आवशयक आहे | १५ | १,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | बी.ए.एम.एस. | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस पदवी<br>२.महाराष्ट्र कौन्सील आफ इंडीयन मेडीसीन कडील नोंदणी आवश्यक आहे. | १५ | ७५,०००/- |
| | बी.एच.एम.एस./ बी.यु.एम.एस. | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस/बी.यु.एम.एस पदवी<br>२.महाराष्ट्र कौन्सील ऑफ होमीओपॅथी कडील नोदणी आवश्यक आहे | १५ | ६०,०००/- |
| ५. | स्टाफ नर्स | १. महाराषट राज्य मध्यमीक व उच्च् माध्यमीक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण<br>२.महाराष्ट् नर्सींग कौन्सील ची जनरल कौनर्सींग व मीडवायफरी या विषयाची पदविका (GNM) किंवा बी.एस.सी. नर्सिंग<br>३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलकडील नोंदणी आवश्यक आहे. | ३० | ४५,०००/- |
| ६. | प्रयोग शाळा तंत्रज्ञ (Lab. Technician) | Master of Science (M.Sc.), Mollecular Biology or Bio Technology or Genetics or Bio tech Chemistry or Micro Biologycal Qualification From recognized university or Institution<br>Or<br>BAcholor Of Science (B.Sc.) and Diploma in Medical Technology (DMLT) Qualification from recognized university or Institution | ०५ | ३०,०००/- |
| ७ | औषध निर्माता (Pharmacist) | D.Pharm or B.Pharm. | ०५ | ३०,०००/- |
| ८. | ऑक्झीलरी नर्स मिडवाईफ (ANM) | १.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>२. शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ऑक्झीलरी नर्स मिडवाईफ (ANM) चा अभ्यासक्रम पुर्ण<br>३. महाराष्ट्र नर्सिंग कौंन्सील कडील नोंदणी आवश्यक. | ४० | ३५,०००/- |
| ९ | बेड साईड सहाय्यक (Bed Side Assistant) | Certificate in Bed Side Assistant<br>Or | ४० | २०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १२th pass and २ years Experience in hospital/ Clinic<br>Or<br>OT Technician<br>NCVT / MSCVT यांचा मान्यता प्राप्त कोर्स. | | |
| १० | माहिती नोंदणीकार (Data Entry Operator) | १. मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा<br>२. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा DOEACC सोसायटीचा अधिकृत CCC किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. | ०८ | २०,०००/- |

**अटी व शर्ती**

१. वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दिनांक ३०/०८/२०२० रोजी ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे.

२. वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या संस्था/ सेवाभावी संस्था यांना प्राधान्य राहील.

३. स्थानिक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४. उपरोक्त पदांकरिता सेवा देणेचा हा ३ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत असेल.

५. निवड झालेल्या उमेदवाराने कामावर हजर होणेपुर्वी विहित केलेल्या नमुन्यातील घोषणापत्र नगरपरिषदेकडे सादर करणे आवश्यक राहील.

६. उमेदवाराने पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांचा छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. कागदपत्राच्या प्राथमिक छाननीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

७. उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची स्वसाक्षांकित (Self Attested) प्रत अथवा जन्म तारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफीकेटची स्वसाक्षांकित (Self Attested) प्रत जोडणे आवश्यक राहील.

८. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.

९. उमेदावाराचे नाव बदलले असेल तर नाव बदलासाठी उमेदवाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्रातील प्रत सादर करावी. उमेदवार मुळ नावाने (Maiden Name) देखील अर्ज करु शकतात.

१०. जाहिरातीमधील विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज किंवा चुकीने भरलेले अर्ज / वय/शैक्षणिक अर्हता/गुणपत्रक इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित (Self Attested) प्रती नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

११. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२. नियुक्ती उमेदवारांना कोविड-१९ संबंधि सर्व कर्तव्य पार पाडावे लागेल.

१३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांच्या कडील पत्र क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.८४/आरोग्य-५. दि.११/०४/२०२० नुसार निवड झालेले उमेदवार प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजअंतर्गत रु.५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख रुपये मात्र) चे विमा संरक्षणास पात्र राहतील.

१४. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची सदर सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१६. उमेदवारास सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने त्यासंदर्भात ३० दिवसांची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

१७. ही सदर सेवा नियुक्ती केवळ साथरोगाच्या कालावधीसाठी संपुर्णपणे तात्पुर्त्या स्वरुपात ठोक मानधनावरील कंत्राटी (करार) पध्दतीने असल्याने उमेदवारास कायमस्वरुपी नियुक्ती मागणीचा हक्क असणार नाही.

१८. सदर जाहिरातीस प्रतिसाद कमी असेल तर सदर पदांसाठीच्या पात्रतेच्या अटी शिथील करण्याचे अधिकार माननीय मुख्याधिकारी यांना आहेत.

१९. नियुक्तीबाबतचे आदेश / सुचना उमेदवारांना त्यांनी दिलेल्या ईमेल वर कळविण्यात येतील.

**<u>विशेष सुचना</u>**

१. सदर जाहिरात ही पात्र उमेदवारांची प्रारुप गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी आहे. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच नगपरिषदेच्या गरज भासेल त्याप्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीतुन कंत्राटी पध्दतीने उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

२. यापुर्वी सादर केलेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३. कोणतेही अर्ज पोस्टाद्वारे/टपालाद्वारे स्विकारले जाणार नाही.

४. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी मुळ अंतिम वर्षाची गुणपत्रीका आणि पदवी प्रमाणपत्रासह इतर सर्व आवश्यक प्रमाणपत्रे व त्यांच्या स्वसाक्षांकित (Self Attested) झेराक्स प्रती, स्वत:च्या पासपोर्ट आकाराच्या फोटो सहित उपस्थित रहावे.

५. उमेदवाराने कामाच्या अनुभवाची मुळ प्रमाणपत्रे त्यांच्या स्वसाक्षांकित (Self Attested) झेराक्स प्रतिसह उपस्थित रहावे.

६. मुलाखतीचे ठिकाण कुळगाव बदलापुर नगरपरिषद मुख्यालय, दुबे हॉस्पीटल,पहिला मजला, कुळगाव बदलापुर पुर्व. ४२१५०३.

७. उमेदवाराच्या थेट मुलाखती या दि. २३/०७/२०२० पासुन सर्व कामाच्या दिवशी (सार्वजनिक सुट्टी वगळुन) घेणेत येतील. सकाळी १० :०० ते सांय. ०५:०० वा. पर्यंतच्या वेळेत पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( दिपक पुजारी ) | (जगतसिंग गिरासे) |
| मुख्याधिकारी | प्रशासक |
| कुळगाव बदलापुर नगरपरिषद | कुळगाव बदलापुर नगरपरिषद |